# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/04/2023 (गुरूवार) सकाळ


## गौणखनिज वाहतुक करणाऱ्या ०४ ट्रक वर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद यांचे आदेशान्वये दिनांक १३/०४/२०२३ रोजी परीवेक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक मा. अनील मस्के सा. (भा.पो.से) व परीवेक्षाधीन पोलीस उप अधीक्षक मा. राहुल झालटे (मपोसे) हे जिल्हा गस्त पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन भिवापूरचे हद्दीत उमरेड चिमुर मार्गावर सकाळी ०४.०० वा. दरम्यान तिन मोठे वाहने (एल.पी) व एक टिप्पर वाहनाचा क्रमांक MH-32/Q-6133, MH-40/BG-9137, MH-32/Q-5931, MH-40/AK-4527 हे रेतीची वाहतुक करतांना मिळुन आले. त्यांच्या वाहनांची तपासणी केली असता सदर वाहन चालकांकडे रॉयल्टी चेक केले असता रॉयल्टी मिळुन आली परंतु त्यांचेकडे काटा पावती नसल्याने व ओव्हरलोडचा संशय येत असल्याने चारही वाहने कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर येथे आणुन त्या ठिकाणी वजन काटयावर चारही गाडयांचे वजन करून त्याची काटा पावती हस्तगत करण्यात आली आहे. सदरचे वाहनातील रेती (गौणखनिज) रॉयल्टीपेक्षा जास्त असल्याची शक्यता असल्याने तहसिल कार्यालय भिवापूर येथे डीटेन करण्यात आले आहे. सदर वाहनांवर पुढील कारवाई करीता तहसिलदार कार्यालय भिवापूर येथे लेखी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर